प्रवेश प्रक्रिया सुरू

शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७

*NEP* २०२०

SHRI VITHALRAO JOSHI VIDYAPEETH

ज्ञानं परमं वेदितव्यम्।



# श्री विठ्ठलराव जोशी विदयापीठ

विशिष्ट श्रेणी अंतर्गत अभिमत विद्यापीठ

कौशल्यपूर्ण हात, संवेदनशील हृदय, प्राचीन ज्ञानपरंपरेचा वारसा


7798 764 690 / 7710 990 880 www.svjct.org careers@svjct.org svjv_official

वालावलकर हॉस्पिटल परिसर, सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१५ ६०६



# आमची ओळख

भारताच्या धोरणात्मक राष्ट्रीय प्राधान्यक्रमांचा, उदयोन्मुख आंतरविद्याशाखीय क्षेत्रांचा तसेच पर्यावरणीय शाश्वतता, क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्टता, भारतीय ज्ञानप्रणालीचे जतन आणि कौशल्याधिष्ठित शिक्षणाची वाढती गरज यांचा विचार करून विद्यापीठ अनुदान आयोगाने (UGC) सन 2023 मध्ये उच्च शिक्षण संस्थांना 'विशिष्ट श्रेणी' (Distinct Category) अंतर्गत नाविन्यपूर्ण शैक्षणिक कार्यक्रम सुरू करण्याची तरतूद केली.

या दूरदृष्टीने प्रेरित होऊन श्री विठ्ठलराव जोशी विद्यापीठ, विशिष्ट श्रेणीअंतर्गत अभिमत विद्यापीठ (Deemed to be University under Distinct Category) स्थापन करण्यात आले आहे. उद्योग क्षेत्राशी भक्कम सहकार्य, प्रत्यक्ष अनुभवावर आधारित कौशल्यविकास, बहुविद्याशाखीय अध्ययन आणि संशोधनाधिष्ठित शिक्षण यांच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण शैक्षणिक कार्यक्रम उपलब्ध करून देणे आणि विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी सक्षम व्यावसायिक म्हणून घडविणे, ही विद्यापीठाची प्रमुख बांधिलकी आहे

आधुनिक आणि आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीच्या दिशेने वाटचाल करत असतानाच, भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाशी आणि भारतीय ज्ञान प्रणालीशी युवा पिढीचे नाते अधिक दृढ करण्यासाठी विद्यापीठ तितकेच कटिबद्ध आहे.

शैक्षणिक वर्ष 2026–27 पासून, विद्यापीठ पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांचे पुढील अभिनव आणि पथदर्शी शैक्षणिक कार्यक्रमांसाठी स्वागत करीत आहे:

## पदवीपूर्व कार्यक्रम

- **बी.एस्सी. स्पेस सायन्स**
- **नैसर्गिक शेती कृत्रिम बुद्धिमतेसह**
- **बी.एस्सी. सायकोलॉजिकल अँड स्पिरिच्युअल हेल्थ**
- **बी.एस्सी. बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन विथ AI**
- **बी.पी.ई.एस. – बॅचलर ऑफ फिजिकल एज्युकेशन अँड स्पोर्ट्स**
- **बी.ए. दर्शनशास्त्र, भारतीय ज्ञानपरंपरा (IKS) व संस्कृत**

## पदव्युत्तर अभ्यासक्रम - 2 वर्षे

- **एम.एस्सी. क्लिनिकल अँड काउन्सेलिंग सायकॉलॉजी**
- **एम.एस्सी. ॲडव्हान्स बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन**

## शैक्षणिक ठळक मुद्दे

- **अंतराळ विज्ञान –** अंतराळ विज्ञान व तंत्रज्ञान, उपग्रह संप्रेषण (Satellite Communication) आणि डेटा सायन्स (Data Science) यांचा समन्वय साधणारा हा भविष्योन्मुख अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना वेगाने विस्तारत असलेल्या अंतराळ उद्योगक्षेत्रातील जागतिक स्तरावरील करिअरच्या संधींसाठी तयार करतो.
- **नैसर्गिक शेती कृत्रिम बुद्धिमतेसह**–कृत्रिम बुद्धिमत्ता , सेंद्रिय व नैसर्गिक शेती आणि डेटा सायन्स यांचा संगम साधणारा हा अभ्यासक्रम शाश्वत शेती, अचूक शेती , हवामानाचा अंदाज, कृषिउद्योजकता आणि स्मार्ट शेती तंत्रज्ञानासाठी विद्यार्थ्यांना सक्षम करतो.
- **बी.एस्सी. बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन विथ AI –** आरोग्यसेवा तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित जैववैद्यकीय प्रणाली, संशोधन, नवोन्मेष आणि वैद्यकीय क्षेत्रातील उपयोजनांचे प्रगत ज्ञान विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमातून प्राप्त होते. विद्यापीठाच्या अत्याधुनिक अध्यापन रुग्णालयामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वैद्यकीय अनुभव (Hands-on Clinical Exposure) घेण्याची संधी मिळते.
- **बी.पी.ई.एस. – बॅचलर ऑफ फिजिकल एज्युकेशन अँड स्पोर्ट्स –** क्रीडा विज्ञान, शास्त्रीय प्रशिक्षणपद्धती, आधुनिक क्रीडा पायाभूत सुविधा आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण यांचा समन्वय साधणारा हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना क्रीडा कामगिरी, क्रीडा व्यवस्थापन आणि संबंधित क्षेत्रांमध्ये यशस्वी कारकीर्द घडविण्यासाठी तयार करतो.
- **बी.एस्सी. सायकोलॉजिकल अँड स्पिरिच्युअल हेल्थ–** आधुनिक मानसशास्त्राचा सर्वांगीण कल्याण, सजगता (Mindfulness) आणि आध्यात्मिक स्वास्थ्याशी समन्वय साधणारा हा वैशिष्ट्यपूर्ण आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम आजच्या समाजासमोरील अत्यंत महत्त्वाच्या गरजांपैकी एका गरजेला व्यापक दृष्टिकोनातून संबोधित करतो.
- **बी.ए. दर्शनशास्त्र, भारतीय ज्ञानपरंपरा (IKS) व संस्कृत –** प्राचीन भारतीय ज्ञान व आधुनिक दृष्टिकोन यांचा समन्वय साधणारा हा अभ्यासक्रम पारंपरिक वेदपाठशाळेच्या (Ved Pathashala) सहकार्याने विद्यार्थ्यांना समकालीन शैक्षणिक वातावरणात संस्कृत आणि भारतीय ज्ञान प्रणालीचा अभ्यास करण्याची संधी उपलब्ध करून देतो

हे सर्व अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक क्षमता, नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि प्रत्यक्ष कार्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्याच्या दृष्टीने काळजीपूर्वक तयार करण्यात आले आहेत. संशोधनाभिमुख अध्यापन, समस्याधारित अध्ययन (Problem-Based Learning), उद्योग क्षेत्राशी सहकार्य आणि अनुभवी व गुणवंत प्राध्यापकांचे मार्गदर्शन यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अध्ययनाचा अनुभव दिला जातो.

सर्व अभ्यासक्रमांची रचना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 नुसार करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना टप्प्याटप्प्याने शैक्षणिक पात्रता प्राप्त करण्याची संधी उपलब्ध आहे:

- **प्रथम वर्ष पूर्ण केल्यानंतर – प्रमाणपत्र (Certificate)**
- **द्वितीय वर्ष पूर्ण केल्यानंतर – पदविका (Diploma)**
- **तृतीय वर्ष पूर्ण केल्यानंतर – पदवी (Bachelor's Degree)**
- **चार वर्षे पूर्ण केल्यानंतर – सन्मानासह पदवी (Bachelor's Degree with Honours)**

यासोबतच विद्यार्थ्यांना विविध बहुविद्याशाखीय ऐच्छिक विषय (Multidisciplinary Electives) निवडण्याची संधी मिळेल. यामध्ये जर्मन, संस्कृत, स्पॅनिश, डेटा सायन्स, उपग्रह संप्रेषण, वैदिक विज्ञान, भगवद्गीता अध्ययन, गोपालन (गोवंश संगोपन), आयुर्वेद, पोषणशास्त्र, कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच इतर अनेक मूल्यवर्धित विषयांचा समावेश आहे.

## जागतिक दर्जाचा विद्यापीठ परिसरआणि अत्याधुनिक सुविधा

- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सहयोग
- उद्योग-शैक्षणिक संशोधन भागीदारी
- समृद्ध ग्रंथालय व डिजिटल अध्ययन सुविधा
- अंतराळ विज्ञान प्रयोगशाळा
- प्रगत संशोधन सुवधांमध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे:
  - स्टेम सेल संशोधन प्रयोगशाळा
  - नेक्स्ट जनरेशनसिक्वेन्सिंग (NGS) प्रयोगशाळा
  - आण्विकजीवशास्त्र प्रयोगशाळा (मॉलिक्युलर बायोलॉजी प्रयोगशाळा)
  - अत्याधुनिक जैववैद्यकीय संशोधन प्रयोगशाळा (Biomedical Research)
- आयसीटी-सक्षम स्मार्ट वर्ग
- ग्रीन हेवन बुक लाउंज
- ड्रीम हेल्थ पार्क
- संगीत व ललित कला केंद्र
- नाविन्य व उद्योजकता क्लब
- आंतरराष्ट्रीय मानक क्रीडा अकादमी
  - सिंथेटिक अथलेटिक ट्रॅक
  - जलतरण तलाव
  - फुटबॉल मैदान
- कॅफेटेरिया आणि विद्यार्थ्यांच्या सुविधा
- आंतरराष्ट्रीय विद्यार्थी विनिमय व सांस्कृतिक संवाद कार्यक्रम
- समृद्ध पक्षी अभयारण्यासह पर्यावरणपूरक हरित कॅम्पस
- सुरक्षित व आरामदायी वसतिगृह सुविधा

परवडणारे शैक्षणिक शुल्क आणि आरामदायी वसतिगृह सुविधा यांमुळे प्रत्येक आर्थिक स्तरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे शक्य होते.

**कौशल्यपूर्ण हात • संवेदनशील हृदय • प्राचीन ज्ञानपरंपरेचा वारसा**' या मूलमंत्राने प्रेरित होऊन, श्री विठ्ठलराव जोशी विद्यापीठ उद्योगाभिमुख शिक्षण, अनुभवाधारित अध्ययन, संशोधन, नवोन्मेष आणि भारतीय मूल्यांच्या माध्यमातून जागतिक स्तरावर सक्षम आणि संवेदनशील व्यावसायिक घडविण्यासाठी कटिबद्ध आहे.

## दूरदृष्टी

प्राचीन ज्ञान, आधुनिक विज्ञान आणि समग्र शिक्षणाचा समन्वय साधून नेते, नवप्रवर्तक आणि परिवर्तन घडवणाऱ्यांच्या नव्या पिढीला सक्षम करणे.

## ध्येय व उद्दिष्टे

उत्कृष्टता, नावीन्य आणि सामाजिक जबाबदारीची संस्कृती जोपासणे, विद्यार्थ्यांना ज्ञान, आधुनिक विज्ञान आणि सर्वांगीण शिक्षणाचा समन्वय साधणारे सर्वसमावेशक शिक्षण प्रदान करणे, जेणेकरून ते सतत बदलणाऱ्या जगात यशस्वी होण्यासाठी तयार होतील.



## पदवीपूर्व कार्यक्रम

- बी.एस्सी.अंतराळ विज्ञान
- बी.एस्सी. कृत्रिम बुद्धिमत्तेसह नैसर्गिक शेती
- बी.एस्सी. मानसशास्त्रीय व आध्यात्मिक आरोग्य
- बी.एस्सी. कृत्रिम बुद्धिमत्तेसह जैववैद्यकीय उपकरणशास्त्र
- बी.पी.ई.एस. – शारीरिक शिक्षण व क्रीडा पदवी
- बी.ए. दर्शनशास्त्र, भारतीय ज्ञानपरंपरा (IKS) व संस्कृत

## पदव्युत्तर अभ्यासक्रम - 2 वर्षे

- एम.एस्सी. क्लिनिकल (नैदानिक) व समुपदेशन मानसशास्त्र
- एम.एस्सी. प्रगत जैववैद्यकीय उपकरणशास्त्र



## पदवीपूर्व अभ्यासक्रमातील टप्प्याटप्प्याने निर्गमनाचे पर्याय

- पहिले वर्ष – प्रमाणपत्र (Certificate)
- दुसरे वर्ष – डिप्लोमा (Diploma)
- तिसरे वर्ष – पदवी (Degree)
- चौथे वर्ष – ऑनर्स / संशोधन पदवी

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020चे प्रमुख लाभ

- बहुप्रवेश व बहिर्गमनाची लवचिकता
- कौशल्याधिष्ठित व रोजगाराभिमुख शिक्षण
- विविध क्षेत्रांमध्ये व्यापक करिअर संधी
- आधुनिक शिक्षणासोबत भारतीय मूल्यांचा समन्वय
- विद्यार्थीकेंद्रित आणि लवचिक शैक्षणिक रचना



# बी.एस्सी. स्पेस सायन्स

भविष्याभिमुख पदवी अभ्यासक्रम भौतिकशास्त्र (फिजिक्स), अंतराळ विज्ञान (स्पेस सायन्स) आणि डेटा सायन्स यांचा समन्वय असलेला हा भविष्याभिमुख पदवी अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमामध्ये वैज्ञानिक मूलभूत तत्त्वांसह दुर्बिण (टेलिस्कोप) संचालन, उपग्रह (सॅटेलाइट) तंत्रज्ञान, भू-स्थानिक तंत्रज्ञान (जिओस्पेशियल टेक्नॉलॉजी), तसेच खगोलशास्त्रीय (अॅस्ट्रोनॉमिकल) माहितीचे विश्लेषण यांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. यामुळे विद्यार्थी अंतराळ संशोधन, रिमोट सेन्सिंग, पृथ्वी निरीक्षण (अर्थ ऑब्झर्वेशन) आणि वेगाने विकसित होत असलेल्या स्पेस टेक्नॉलॉजी क्षेत्रातील करिअरसाठी सक्षम होतात




## पात्रता

- मान्यताप्राप्त शिक्षण मंडळातून इयत्ता 12 वी उत्तीर्ण (कोणत्याही शाखेतून) किंवा
- 10+3 डिप्लोमा (AICTE मान्यताप्राप्त)

## मुख्य विषय

- गणितीय भौतिकशास्त्र, क्वांटम मेकॅनिक्स व ऊष्मागतिकी (थर्मोडायनॅमिक्स)
- खगोलशास्त्र, खगोलभौतिकशास्त्र (अॅस्ट्रोफिजिक्स), आकाशगंगा (गॅलेक्सीज) व ग्रहविज्ञान
- उपग्रह प्रणाली, सेन्सर्स, रिमोट सेन्सिंग व टेलिमेट्री
- कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), क्लाउड कॉम्प्युटिंग, डेटा सायन्स व अनुप्रयुक्त भूभौतिकशास्त्र
- डेटा स्ट्रक्चर्स, डेटा मायनिंग, अल्गोरिदम्स व डेटा व्हिज्युअलायझेशन
- इमेज प्रोसेसिंग, मशीन लर्निंग व प्रत्यक्ष प्रात्यक्षिक प्रशिक्षण

## कौशल्यवर्धक व ऐच्छिक विषय


- मूलभूत इलेक्ट्रॉनिक्स व ऑप्टिक्स
- संवाद कौशल्ये व परदेशी भाषा
- भारतीय तत्त्वज्ञान व ज्ञानपरंपरा
- योग, ध्यान व ताण-तणाव व्यवस्थापन
- हरित कौशल्ये व सेंद्रिय शेती
- अन्न उत्पादन व मधमाशी पालन
- आहारशास्त्र (भारतीय पोषण विज्ञान)

## अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) अनुरूप।
- उद्योगाभिमुख अभ्यासक्रम
- स्पेस सेक्टर व GMRT चा प्रत्यक्ष परिचय
- कौशल्याधारित व भविष्याभिमुख शिक्षण

## करिअरच्या संधी

- अंतराळ वैज्ञानिक (स्पेस सायंटिस्ट) व उपग्रह अभियंता
- खगोलभौतिकशास्त्रज्ञ (अॅस्ट्रोफिजिसिस्ट) व खगोल संशोधक
- रिमोट सेन्सिंग व जिओस्पेशियल विश्लेषक
- स्पेस डेटा सायंटिस्ट (AI व ML)
- संरक्षण संशोधन वैज्ञानिक (DRDO / BARC)
- स्पेस सिस्टीम्स व इन्स्ट्रुमेंटेशन अभियंता
- मशीन लर्निंग व डेटा सायंटिस्ट
- हवामान व पृथ्वी निरीक्षण (अर्थ ऑब्झर्वेशन) तज्ज्ञ



# नैसर्गिक शेती कृत्रिम बुद्धिमतेसह

नैसर्गिक शेती, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), डेटा सायन्स आणि शाश्वत शेती यांचा समन्वय असलेला बहुविषयक पदवी अभ्यासक्रम. या अभ्यासक्रमामध्ये 60% प्रत्यक्ष प्रात्यक्षिक प्रशिक्षण आणि 40% शैक्षणिक अध्ययन यावर भर दिला जातो. पारंपरिक नैसर्गिक शेतीचे ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान जसे की ड्रोन, सेन्सर्स, डेटा विश्लेषण, मशीन लर्निंग आणि कॉम्प्युटर व्हिजन यांचा प्रभावी वापर शिकविला जातो. तसेच संशोधन, कृषी उद्योजकता, कृषी उत्पादनांचे मूल्यवर्धन, उद्योगांशी सहकार्य आणि नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान यांवर विशेष भर देऊन विद्यार्थ्यांना आधुनिक व शाश्वत शेती क्षेत्रात यशस्वी करिअरसाठी तयार केले जाते.




## पात्रता

- मान्यताप्राप्त मंडळातून 12 वी (विज्ञान / कला / वाणिज्य / कृषी विषयाशी संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रम) उत्तीर्ण
- कृषी किंवा संबंधित शाखेतील डिप्लोमा (10+2 किंवा 10+3) पूर्ण केलेले विद्यार्थीही प्रवेशासाठी पात्र आहेत.

## मुख्य विषय

- नैसर्गिक शेतीची मूलतत्त्वे
- भूमी सुपोषण
- गो-आधारित शेती निविष्ठा (इनपुट) प्रणाली
- पर्यावरणपूरक पीक संरक्षण
- डिजिटल शेतीची मूलभूत तत्त्वे
- कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व मशीन लर्निंग
- ड्रोन व कृषी रोबोटिक्स
- स्मार्ट सिंचन प्रणाली

## कौशल्यवर्धक व ऐच्छिक विषय

- संवाद कौशल्य
- भाषा – इंग्रजी, जर्मन / स्पॅनिश
- कृषी डेटा विश्लेषण
- बहुविषयक अभ्यासक्रम

## अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

- नैसर्गिक शेती व कृषी पर्यावरणशास्त्र
- माती, पीक व जैव-निविष्ठा व्यवस्थापन
- पीक विविधीकरण व मूल्यवर्धन
- AI आधारित स्मार्ट शेती व प्रत्यक्ष प्रशिक्षण

## करिअरच्या संधी

- ॲग्री-टेक व उद्योग क्षेत्र
- ॲग्री-टेक कंपन्या (AI व रोबोटिक्स),ॲग्री-टेक स्टार्टअप्स
- पर्यावरणपूरक कृषी उत्पादन उद्योग
- AI आधारित कृषी डेटा विश्लेषक
- उदयोन्मुख करिअर:प्रिसिजन अ◌ॅग्रीकल्चर (अचूक शेती) तज्ज्ञ, AI आधारित कृषी डेटा विश्लेषक,AI आधारित कृषी डेटा विश्लेषक
- उच्च शिक्षणाच्या संधी
  - एम.एस्सी. – नैसर्गिक शेती / शाश्वत शेती
  - एमबीए – ॲग्री-बिझनेस मॅनेजमेंट
- जैव-निविष्ठा (Bio-input) उत्पादन क्षेत्र
- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था (NGO)






# बी.एस्सी. सायकोलॉजिकल अँड स्पिरिच्युअल हेल्थ




मानसशास्त्र आणि आध्यात्मिक आरोग्य यांचा समन्वय साधणारा एक आंतरविद्याशाखीय पदवी अभ्यासक्रम.हा अभ्यासक्रम वैज्ञानिक मानसशास्त्र आणि आध्यात्मिक कल्याण यांचा समन्वय साधतो. मानसशास्त्र, समुपदेशन, मानसशास्त्रीय मूल्यमापन, योग, ध्यान, माइंडफुलनेस, तसेच भारतीय आध्यात्मिक परंपरा यांच्या माध्यमातून सर्वांगीण मानसिक आरोग्याचा विकास घडवून आणण्यावर या अभ्यासक्रमात भर दिला जातो. या अभ्यासक्रमामध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षण, रुग्णालयीन प्रात्यक्षिक, संशोधन कार्य, तसेच विविध मानसिक आरोग्य क्षेत्रांतील अनुभव दिला जातो. त्यामुळे विद्यार्थी मानसशास्त्र, समुपदेशन, मानसिक आरोग्य व कल्याण, तसेच उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये यशस्वी करिअरसाठी सक्षम बनतात.

## पात्रता

- मान्यताप्राप्त शिक्षण मंडळातून इयत्ता 12 वी उत्तीर्ण (कोणत्याही शाखेतून) किंवा
- ए.एन.एम./जी.एन.एम. / Allied Health / Psychology Certificate (40 Credits)
- द्वितीय वर्षात थेट प्रवेशासाठी पात्र

## मुख्य विषय

- निरोगी बालविकास
- असामान्य मानसशास्त्र
- समुपदेशन व मानसोपचार
- मानसशास्त्रीय चाचण्या व मूल्यमापन
- मानसिक आरोग्य संवर्धन
- संशोधन पद्धती
- योग, ध्यान व माइंडफुलनेस
- भारतीय तत्त्वज्ञान व आध्यात्मिक परंपरा

## कौशल्यवर्धक व ऐच्छिक विषय

- मानव संसाधन व्यवस्थापन
- पुनर्वसन मानसशास्त्र
- समुपदेशन व मानसोपचार
- मानसिक आरोग्य संवर्धन
- योग, ध्यान व माइंडफुलनेस
- योग, ध्यान व माइंडफुलनेस
- भारतीय तत्त्वज्ञान व आध्यात्मिक परंपरा
- व्यक्तिमत्त्व विकास व जीवनकौशल्ये

## अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) व NHEQF अनुरूप अभ्यासक्रम
- बहुविषयक (Interdisciplinary) व कौशल्याधारित शिक्षण
- अनुभवी व प्रशिक्षित प्राध्यापकांचे मार्गदर्शन
- आधुनिक मानसशास्त्र आणि भारतीय आध्यात्मिक परंपरांचा समन्वय
- संशोधनाभिमुख, अनुभवाधारित आणि कौशल्यकेंद्रित शिक्षण

## करिअरच्या संधी

- शालेय समुपदेशक
- बिहेविअर कौन्सेलर व रिमेडियल शिक्षकIndustrial Psychologist
- संशोधन संस्था व शिक्षण क्षेत्रात करिअर
- पदव्युत्तर शिक्षण (M.Sc.), NET/SET व संशोधन (Ph.D.) साठी भक्कम पाया
- रुग्णालये व मानसिक आरोग्य संस्थांमध्ये Psychological Assessment व Counselling Psychometric Testing Specialist





# बी.एस्सी. बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन विथ AI

भविष्याभिमुख पदवी अभ्यासक्रम असून यामध्ये बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन, मानवी शरीररचना व शरीरक्रियाशास्त्र (ह्युमन ॲनाटॉमी अँड फिजिऑलॉजी), कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), मशीन लर्निंग, ऑटोमेशन आणि वैद्यकीय प्रतिमांकन (मेडिकल इमेजिंग) यांचा समन्वय करण्यात आला आहे. अत्याधुनिक बायोमेडिकल प्रयोगशाळा आणि बहुविशेषज्ञ (मल्टिस्पेशालिटी) रुग्णालयातील प्रत्यक्ष प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना आरोग्यसेवा क्षेत्रातील उपकरणांची स्थापना, संचालन, देखभाल आणि नवकल्पना विकसित करण्याचे कौशल्य दिले जाते. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना आरोग्यसेवा, वैद्यकीय तंत्रज्ञान आणि संशोधन क्षेत्रातील करिअरसाठी सक्षम बनवतो.



## पात्रता

- मान्यताप्राप्त शिक्षण मंडळातून इयत्ता 12 वी उत्तीर्ण (कोणत्याही शाखेतून) किंवा
- AICTE मान्यताप्राप्त 10+3 डिप्लोमा

## मुख्य विषय

- मानवी शरीररचना व शरीरक्रियाशास्त्र (ॲनाटॉमी अँड फिजिऑलॉजी)
- सेन्सर्स व ट्रान्सड्युसर्स
- निदान व उपचारात्मक वैद्यकीय उपकरणे
- वैद्यकीय प्रतिमांकन (मेडिकल इमेजिंग) व इमेज प्रोसेसिंग
- ट्रबलशूटिंग तंत्रे
- रुग्णालयीन जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन
- मानवी पुनर्वसन (ह्युमन रिहॅबिलिटेशन) व न्यूक्लियर मेडिसिन
- मायक्रोकंट्रोलर्स, मायक्रोप्रोसेसर्स व पायथॉन
- इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT), मशीन लर्निंग व न्यूरल नेटवर्क्स
- कॉम्प्युटर व्हिजन व संशोधन पद्धती (रिसर्च मेथडॉलॉजी)

## कौशल्यवर्धक व ऐच्छिक विषय

- इलेक्ट्रॉनिक्स व मूलभूत गणित
- दर्शनशास्त्र (भारतीय ज्ञानपरंपरा – IKS)
- संवाद कौशल्ये व जर्मन भाषा
- ताण-तणाव व्यवस्थापन
- हरित कौशल्ये व शाश्वत विकास
- जलसंपदा व्यवस्थापन
- योग व ध्यान

## अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) व राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रता आराखडा (NHEQF) अनुरूप
- कौशल्याधारित व बहुविषयक अभ्यासक्रम
- ऑटोमेशन व कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मधील विशेष प्राविण्य

## करिअरच्या संधी

- बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन अभियंता
- AI अभियंता – हेल्थकेअर व मेडिकल डिव्हाइसेस
- मेडिकल इमेजिंग व इमेज प्रोसेसिंग तज्ज्ञ
- क्लिनिकल / हॉस्पिटल इक्विपमेंट अभियंता
- हेल्थकेअर डेटा सायंटिस्ट
- पुनर्वसन (रिहॅबिलिटेशन) व सहाय्यक तंत्रज्ञान अभियंता
- न्यूक्लियर मेडिसिन टेक्नॉलॉजिस्ट
- IoT व स्मार्ट हेल्थकेअर सिस्टीम्स



# बी.पी.ई.एस. – बॅचलर ऑफ फिजिकल एज्युकेशन अँड स्पोर्ट्स



क्रीडा विज्ञान, शारीरिक शिक्षण, फिटनेस, आधुनिक तंत्रज्ञान आणि उद्योजकता यांचा समन्वय साधणारा हा भविष्याभिमुख पदवी अभ्यासक्रम आहे. SVJCT च्या आंतरराष्ट्रीय क्रीडा अकादमी, अत्याधुनिक क्रीडा सुविधा, स्पोर्ट्स परफॉर्मन्स लॅबोरेटरीज आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखालील व्यापक प्रत्यक्ष प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना क्रीडा व्यावसायिक, प्रशिक्षक, फिटनेस तज्ज्ञ, शारीरिक शिक्षण शिक्षक, क्रीडा व्यवस्थापक आणि उद्योजक म्हणून यशस्वी करिअरसाठी सक्षम केले जाते.

## पात्रता

- मान्यताप्राप्त शिक्षण मंडळातून इयत्ता 12 वी उत्तीर्ण (कोणत्याही शाखेतून)
- राज्य / राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा सहभाग प्रमाणपत्रधारक उमेदवारांना प्राधान्य
- क्रीडा संबंधित प्रवेश परीक्षा / स्पर्धा परीक्षा देणारे उमेदवारही अर्ज करण्यास पात्र

## मुख्य विषय

- शारीरिक शिक्षण अध्यापनशास्त्र
- क्रीडा प्रशिक्षण पद्धती (Sports Training & Coaching)
- शरीर शास्त्र (Anatomy) व व्यायाम शरीरक्रियाशास्त्र (Exercise Physiology)
- काइन्सिओलॉजी (Kinesiology) व बायोमेकॅनिक्स (Biomechanics)
- व्यायाम शरीरक्रियाशास्त्र (Exercise Physiology)
- क्रीडा मानसशास्त्र व समाजशास्त्र
- अभ्यासक्रम रचना (Curriculum Design)
- क्रीडा व्यवस्थापन
- व्यापक प्रत्यक्ष प्रात्यक्षिक प्रशिक्षण

## कौशल्यवर्धक विषय

- प्रथमोपचार
- योग विज्ञान
- पंच कार्य (Officiating)
- जिम व फिटनेस प्रशिक्षण
- स्पोर्ट्स मसाज चिकित्सा
- क्रीडा छायाचित्रण
- व्हिडिओ विश्लेषण (Video Analysis)
- भारतीय ज्ञानपरंपरा (IKS)

## अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) व राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रता आराखडा (NHEQF) अनुरूप
- क्रीडा विज्ञानाशी संबंधित पूरक विषयांचा समावेश
- उच्च दर्जाची क्रीडा कामगिरी (High Performance) व उत्कृष्टतेवर भर
- प्रत्यक्ष कोचिंग, मैदानी प्रशिक्षण व प्रथम वर्षापासून इंटर्नशिप
- संशोधनाभिमुख व कौशल्याधारित शिक्षण

## करिअरच्या संधी

- शारीरिक शिक्षण शिक्षक
- क्रीडा प्रशिक्षक (Sports Coach)
- स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग प्रशिक्षक
- क्रीडा कामगिरी विश्लेषक
- शासकीय क्रीडा अधिकारी
- फिटनेस प्रशिक्षक
- योग प्रशिक्षक
- युवा विकास अधिकारी (Khelo India / Fit India)
- क्रीडा व्यवस्थापन व क्रीडा उद्योग क्षेत्रातील विविध संधी





# बी.ए. दर्शनशास्त्र, भारतीय ज्ञानपरंपरा (IKS) व संस्कृत

भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृत आणि बहुशाखाविषयक शिक्षणाचा समन्वय साधणारा हा भविष्याभिमुख पदवी अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमामध्ये भारतीय षड्दर्शन परंपरा, भारतीय ज्ञानपरंपरा (Indian Knowledge Systems – IKS) आणि संस्कृत यांचा सखोल अभ्यास केला जातो. यासोबतच तर्कशक्ती, नैतिक मूल्ये, संशोधन कौशल्ये आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), संज्ञानशास्त्र (कॉग्निटिव्ह सायन्स), सार्वजनिक धोरण (पब्लिक पॉलिसी) आणि शाश्वत विकास (सस्टेनेबिलिटी) यांसारख्या आधुनिक क्षेत्रांतील उपयोजनांवर भर दिला जातो.




## पात्रता

- मान्यताप्राप्त शिक्षण मंडळातून इयत्ता 12 वी उत्तीर्ण (कोणत्याही शाखेतून) किंवा
- मान्यताप्राप्त संस्कृत किंवा वैदिक संस्थेतून 10+ प्राक् शास्त्र/ वेदभूषण उत्तीर्ण
- संहिता पठण किंवा SVA शाखा अध्ययन पूर्ण केलेले विद्यार्थीही प्रवेशासाठी पात्र

## मुख्य विषय

- षड् दर्शन, व्याकरणशास्त्र, अर्थशास्त्र, गणित, वेदाङ्गज्योतिष, भगवद्गीता
- न्यायदर्शन -तर्कशास्त्र व युक्तिवाद
- वैशेषिक दर्शन- वस्तुस्थितीचे विज्ञान
- मीमांसा दर्शन -चिकित्सक विचार व अर्थनिर्णय
- वेदांत दर्शन - आध्यात्मिक तत्त्वज्ञान
- सांख्य दर्शन- तर्काधिष्ठित विश्लेषणात्मक तत्त्वज्ञान

## कौशल्यवर्धक व ऐच्छिक विषय

- भाषा – इंग्रजी, जर्मन
- डिजिटल साक्षरता व डेटा अॅनालिटिक्स
- संवाद कौशल्ये
- पौष्टिक आहार निर्मिती
- हरित कौशल्ये व कचरा व्यवस्थापन
- योग व सर्वांगीण आरोग्य

## अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) व राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रता आराखडा (NHEQF) अनुरूप
- दर्शनशास्त्र, संस्कृत व भारतीय ज्ञानपरंपरा (IKS) यांचा बहुशाखाविषयक अभ्यासक्रम
- कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), मानसशास्त्र, संज्ञानशास्त्र (Cognitive Science) व नीतिशास्त्र यांचा समन्वय
- अनुभवाधारित शिक्षण, इंटर्नशिप व संशोधन प्रकल्प
- प्राचीन भारतीय ज्ञानाचा आधुनिक व जागतिक संदर्भात उपयोग

## करिअरच्या संधी

- दर्शनशास्त्रे, भारतीय ज्ञानपरंपरा (IKS), संस्कृत याविषयांचे अध्यापन व संशोधन
- भाषांतर, हस्तलिखित संवर्धन व ग्रंथालय सेवा
- प्रकल्प, सल्लागार सेवा व उद्योजकता
- UPSC / MPSC, विधी (Law) व उच्च शिक्षण
- आयुर्वेद, पारंपरिक ज्ञान संस्था व परदेशी विद्यापीठे
- चित्रपट, माध्यमे, कीर्तन व प्रवचन





# एम.एस्सी. क्लिनिकल अँड काउन्सेलिंग सायकॉलॉजी




मानसशास्त्रीय मूल्यमापन, समुपदेशन, निदान आणि मानसोपचार यांमधील प्रगत प्रशिक्षणाद्वारे कुशल, नैतिक आणि संवेदनशील मानसिक आरोग्य व्यावसायिक घडविणारा अभ्यासक्रम. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) सर्वांगीण मानसिक आरोग्य दृष्टिकोनाशी सुसंगत असलेला हा कार्यक्रम सैद्धांतिक ज्ञानासोबत प्रत्यक्ष क्लिनिकल प्रशिक्षण, संशोधन आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालील पर्यवेक्षित सराव यांचा समन्वय साधतो, ज्यामुळे विद्यार्थी मानसिक आरोग्य क्षेत्रातील विविध व्यावसायिक भूमिकांसाठी सक्षम होतात.

## पात्रता

- मानसशास्त्र विषयासह बी.ए./बी.एस्सी. (Psychology)
- किंवा मानसशास्त्रातील ब्रिज कोर्स पूर्ण केलेला कोणताही पदवीधर (विद्यापीठाच्या नियमांनुसार)

## मुख्य विषय

- मनोरोगशास्त्र
- समुपदेशन मानसशास्त्र
- क्लिनिकल मूल्यमापन
- मानसोपचार
- संशोधन पद्धती
- मानस-औषधशास्त्र

## पूरक व ऐच्छिक विषय

- सकारात्मक मानसशास्त्र व कल्याण
- माध्यम मानसशास्त्र
- न्यायवैद्यक मानसशास्त्र
- आंतरसंस्कृतिक मानसशास्त्र
- अनुप्रयुक्त मानसशास्त्रीय हस्तक्षेप
- संशोधन व व्यावसायिक नीतिशास्त्र

## अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) अनुकूल अभ्यासक्रम
- क्लिनिकल व समुपदेशन कौशल्यांचा विकास
- मानसशास्त्रीय मूल्यमापन
- मानसोपचार तसेच CBT/REBT तंत्रांचे प्रशिक्षण
- पर्यवेक्षित प्रात्यक्षिक व रुग्णालयीन इंटर्नशिप
- नीतिशास्त्र, संशोधन, केस स्टडी आणि प्रबंध

## करिअरच्या संधी

- रुग्णालये व मानसिक आरोग्य दवाखाने
- पुनर्वसन व व्यसनमुक्ती केंद्रे
- शाळा, महाविद्यालये व स्वयंसेवी संस्था (NGOs)
- कॉर्पोरेट व वेलनेस केंद्रे
- संशोधन संस्था
- खाजगी समुपदेशन व क्लिनिकल प्रॅक्टिस



# एम.एस्सी. ॲडव्हान्स बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन – 2 वर्षे

बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), मेडिकल इमेजिंग, रोबोटिक्स आणि क्लिनिकल तंत्रज्ञान यांचा समन्वय साधणारा हा प्रगत पदव्युत्तर अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमामध्ये प्रगत तांत्रिक ज्ञान, प्रत्यक्ष प्रशिक्षण, संशोधन आणि नवोपक्रम (इनोव्हेशन) यांवर विशेष भर देण्यात आला असून, विद्यार्थ्यांना हेल्थकेअर टेक्नॉलॉजी, मेडिकल डिव्हाइस उद्योग आणि बायोमेडिकल संशोधन क्षेत्रातील नेतृत्वाच्या भूमिकांसाठी सक्षम बनविले जाते.



## पात्रता

- बी.एस्सी. बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन किंवा
- बी.एस्सी. (रसायनशास्त्र / इलेक्ट्रॉनिक्स / भौतिकशास्त्र किंवा समकक्ष पदवी)
- आवश्यकतेनुसार प्रवेशपूर्व 3 महिन्यांचा ब्रिज कोर्स

## मुख्य विषय

- बायोसिग्नल प्रोसेसिंग
- क्लिनिकल इन्स्ट्रुमेंटेशन
- सिग्नल व मेडिकल इमेज प्रोसेसिंग
- न्यूक्लियर मेडिसिन
- रिहॅबिलिटेशन इंजिनिअरिंग
- बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशनमधील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व न्यूरल नेटवर्क्स
- वैद्यकीय रोबोटिक्स (रोबोटिक्स इन मेडिसिन)
- हॉस्पिटल व्यवस्थापन

## कौशल्यवर्धक व ऐच्छिक विषय

- सेंद्रिय शेती व भारतीय ज्ञानपरंपरा
- मानसशास्त्र, क्रीडा व योग
- जर्मन भाषा
- मूलभूत गणित
- स्पेस सायन्स व पोषणशास्त्र

## अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) व राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रता आराखडा (NHEQF) अनुरूप
- कौशल्याधारित व बहुविषयक अभ्यासक्रम
- ऑटोमेशन व कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मधील विशेष प्राविण्य
- संशोधनाभिमुख व उद्योगाभिमुख शिक्षण

## करिअरच्या संधी

- रुग्णालये व आरोग्यसेवा संस्था
- वैद्यकीय उपकरण निर्मिती उद्योग
- कॅलिब्रेशन व टेस्टिंग प्रयोगशाळा
- शासकीय नोकरीच्या संधी
- संशोधन व विकास (R&D)
- बायोमेडिकल व हेल्थकेअर टेक्नॉलॉजी क्षेत्र



# सर्व एकाच कॅम्पसमध्ये

## आपल्याला आवश्यक सर्वकाही.

शिकण्यासाठी शांत जागा शोधत आहात का?
ग्रीन हेवन बुक लाउंज



कॉफी ब्रेक हवा आहे का?
ऑलिम्पिक कॅफे



तुम्ही तुमचे घर कोठे म्हणाल?
वसतिगृह



तुम्ही येथे सक्रिय राहाल का?
क्रीडा संकुल, इनडोअर आणि आउटडोअर खेळ



तुम्ही कुठे जेवणार?
भोजन सेवा



वर्गाच्या पलीकडे पाहताय?
युद्धस्मृती जॅग्वार लढाऊ विमान आणि 'टी55 अनुराग' लष्करी रणगाडा




राष्ट्राला प्रेरणा कोणी दिली?
लोकमान्य टिळक आणि वीर सावरकर म्युरल



शिक्षण, जीवन आणि विकासासाठी तयार केलेला आमचा परिसर, विद्यार्थी जीवनाच्या प्रत्येक पैलूला आधार देणाऱ्या उत्कृष्ट सुविधा पुरवतो.













